**रे.के. नं. ६७ /२०२०**

**नि. क्र. ३७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा जबाब शथपेवर सुरु.**

**नाव** – अनिता शांताराम कोटकर,

**वय**– ५२ वर्षे, **नोकरी**– अंगणवाडी सेविका,

**सध्या राहणार –** मोर्डे, गवळीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपातगोळ यांच्याकडून –**

०१. माझ्या घरी माझे पती शांताराम कोटकर, मुलगी संजना कोटकर, मुलगा संदेश कोटकर असे असतो. आमच्या शेजारी रविंद्र राजाराम कोटकर राहतात. ते नात्याने माझे चुलत दिर आहेत. दि. १९/०८/२०२० रोजी माझी मुलगी रात्री अंगणात मोबाईल घेऊन बसली होती. मी त्यावेळी जेवण करत होते.

०२. त्यावेळी आरोपी तेथे येऊन माझ्या मुलीला म्हणाला की, 'तुझ्या मोठ्या पप्पांना सिताराम कोटकर यांना कापुन टाकणार आहे'. मी त्यावेळी घरातुन बाहेर गेले. मी त्याला बोलले की, 'तु माझ्या मुलीला का बोलतोस', ते म्हणजे सिताराम कोटकर घरी असताना त्यांना बोल'. त्यावेळी त्याने त्याच्या हातातील कोयती माझ्या मुलीच्या अंगावर उगारली. ती कोयती माझ्या मुलीच्या डाव्या हाताच्या बोटाला लागुन रक्त आले.

०३. मी त्यावेळी पुढे गेले असता आमच्या धकलाबुकल होऊन ती कोयती त्याने माझ्या अंगावर उगारली व मला डाव्या हाताच्या खांद्याच्या बावशाला लागली. त्यावेळी माझे पती आणि जमलेल्या लोकांनी सोडवा सोडव केली. रविंद्र राजाराम कोटकर तेथून बाहेर जात असताना शिवीगाळ करतच आम्हाला मारण्याची धमकी देत

गेला.

०४. त्यानंतर मी, माझी मूलगी आणि पती गावचे पोलीस पाटलांकडे गेलो. त्यांनी आम्हाला पुढे पोलीस स्टेशनला जायला सांगीतले. त्यानंतर मी, माझे पती आणि मुलगी रिक्षाने साखरपा पोलीस स्टेशनला गेलो. त्यांनी आम्हाला साखरप्यातील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठवले. आम्हाला अधिक उपचारा कराता सिव्हील हॉस्पीटल रत्नागिरीला पाठवण्यात आले. पोलीसांना आम्ही घडलेली घटना सांगीतली. पोलीसांनी लिहुन घेतलेली माहीती मी वाचली. साक्षीदाराला फिर्यादी जाबाब दाखवला. यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्याच सांगण्यानुसार नमुद आहे. सही मी वाचून केलेली आहे. साक्षीदाराच्या फिर्यादी जबाबाला **नि.३८** देण्यात येते.

०५. मला ती कोयती दाखवल्यास मी ओळखु शकते. साक्षीदाराला मुद्देमाल कोयती दाखवण्यात आली. ही तीच कोयती आहे. सदर मुद्देमाल आर्टीकल 'अ' येथे आहे. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. त्यानंतर दुस–या दिवशी पोलीस तपासासाठी आले होते. पोलीसांनी त्या ठिकाणी घटनास्थळाचा आणि कोयतीचा फोटो काढून घेतला. साक्षीदाराला पंचनाम्यासोबत असलेले फोटो दाखवण्यात आले. या फोटोमध्ये मी आहे. हे फोटो आमच्या घरातील अंगणातील आहेत. फोटोमधील घर माझे आहे. पोलीसांनी विचारपुस केली. मी घडल्याप्रमाणे घटना सांगीतली.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन –**

०६. हे म्हणणे खरे आहे की, सिताराम व बबन कोटकर माझे दीर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दत्ताराम वाजे व रमेश कापदुले यांच्याशी माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मोर्डे गवळीवाडी येथे कोटकर, कापदुले, वाजे, महाडीक आडनावाचे कुटुंबिय राहतात.

०७. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या आजुबाजूला राहती घरे त्यावेळी होती. त्यामध्ये वाजे, काबदुले आणि कोटकर कुटुंबियांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरात काही गडबड, गोंधळ झाल्यास या कुटुंबियांना समजु शकते.

०८. आमच्या गावचे पालीस पाटील ब्राम्हणवाडीत राहतात. ब्राम्हणवाडी गवळीवाडीपासून दहा ते पंधरा मिनीटे पाई अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला साखरपा पोलीस स्टेशनला जायचे असल्यास वांझोळे गावावरुन जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, साखरपा पोलीस स्टेशनला पोहोचण्याआधी या मार्गावर खाजगी दवाखाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनच्या आधी साखरपा बस स्थानकाजवळ प्राथमिक आरोग्य केंद्र आहे.

०९. माझ्या म्हणण्याप्रमाणे अंदाजे ०९.३० च्या सुमारास मी साखरपा दुरक्षेत्रात गेले होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे पोलीस स्टेशनला आम्ही अर्धा एक तास होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे त्यानंतर आम्ही उपचारा करता दवाखान्यात गेलो. दवाखान्यात आम्ही तासभर होतो. हे म्हणणे खरे आहे की, या दरम्यानच्या काळात मी रत्नागिरी सिव्हीलला जाईपर्यंत मी सांगीतली त्यानुसार पोलीसांनी माहीती लिहुन घेतली असे काही झाले नाही.

१०. माझ्या म्हणण्याप्रमाणे सिव्हील हॉस्पीटलला मी अर्धा ते पाऊण तास होते. साक्षीदार सांगतो की, माझ्या म्हणण्याप्रमाणे रात्रीच्या ०३.०० पर्यंत आम्ही सिव्हील हॉस्पीटल, रत्नागिरीला होतो.

११. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यानुसार दत्ताराम वाजे व रमेश काबदुले यांना मी पोलीस स्टेशनला सह्या करण्यासाठी घेऊन गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, कोयती सारखे हत्यार खांद्याला, बावशाला लागले असता त्या ठिकाणी कपडे फाटणार. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटने दिवशी माझे कपडे

फाटले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांकडे ते कपडे जमा केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेवेळी माझे कपडे फाटले हे मी खोटे सांगत आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी पोलीस माझ्या घरी आले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीस कीती वाजता आले होते ती वेळ सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोयती सारखे हत्यार हाताला लागल्यास जमीनीवर रक्त सांडु शकते. हे म्हणणे खरे आहे की, शेजा–यांशी माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीशी आमचे संबंध चांगले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गावात राहीला नाही पाहीजे असे आमच्या भावकीचे म्हणणे होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मोर्डे गवळीवाडी येथे राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने वाडीमध्ये रहायला येऊ नये याकरता ही खोटी फिर्याद दिलेली आहे.

१३. माझ्या सरतपसात सांगीतल्या प्रमाणे, मी त्यावेळी जेवण करत होते, त्यावेळी आरोपी तेथे येऊन माझ्या मुलीला म्हणाला की, 'तुझ्या मोठ्या पप्पांना सिताराम कोटकर यांना कापुन टाकणार आहे', त्यावेळी त्याने त्याच्या हातातील कोयती माझ्या मुलीच्या अंगावर उगारली, ती कोयती माझ्या मुलीच्या डाव्या हाताच्या बोटाला लागुन रक्त आले, मी त्यावेळी पुढे गेले असता आमच्या धकलाबुकल होऊन ती कोयती त्याने माझ्या अंगावर उगारली व मला डाव्या हाताच्या खांद्याच्या बावशाला लागली, त्यानंतर मी, माझी मूलगी आणि पती गावचे पोलीस पाटलांकडे गेलो, त्यांनी आम्हाला पुढे पोलीस स्टेशनला जायला सांगीतले, त्यानंतर मी, माझे पती आणि मुलगी रिक्षाने साखरपा पोलीस स्टेशनला गेलो, त्यांनी आम्हाला साखरप्यातील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठवले, आम्हाला अधिक उपचारा कराता सिव्हील हॉस्पीटल रत्नागिरीला पाठवण्यात आले, हे सर्व मी

खोटे नमुद केले आहे, हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद खोटी आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.07.23 17:57:38 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक २३/०७/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**